एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ (सीपीटीपी-७) मधील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील ०९ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना नियमित पदस्थापना देण्याकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/न.क्र.२०२४-१८/३४९

तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर, जमशेदजी टाटा मार्ग,

चर्चगेट, मुंबई-४०००२०.

दिनांक:- ०५ मार्च २०२४

संदर्भ: अवर सचिव, वित्त विभाग (कोषा.प्रशा.२) यांचे पत्र क्र. संलेको-२०२१/प्र.क्र.१७१/कोषा.प्रशा.-२ दि.०४/०३/२०२४

**परिपत्रक:-**

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ (सीपीटीपी-७) मधील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील ०९ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना नियमित पदस्थापना देण्याकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत संदर्भीय पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

२. सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त पदांवर नियमित पदस्थापना देण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन परिच्छेद क्र.४ मधील नमूद अधिकाऱ्यांनी आपला महसुली विभाग पसंतीक्रम सोबत जोडलेल्या विकल्प नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह रविवार दि.१० मार्च २०२४ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत संचालनालयास सादर करावा.

३. हे परिपत्रक संचालनालयाच्या https://www.mahakosh.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून त्याकरिता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही, याची सबंधितांनी नोंद घ्यावी. सबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प प्रत्यक्ष संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे अथवा adtransfer2021@gmail.com याच ई-मेलवर (स्वाक्षरी केलेले विकल्प व कागदपत्रे केवळ PDF स्वरूपातच) विहित मुदतीत सादर करावेत. संचालनालयाच्या अन्य ई-मेलवर पाठविण्यात आलेले विकल्प विचारात घेतले जाणार नाहीत. ई-मेलद्वारे सादर केलेल्या विकल्पाची मूळ स्वाक्षरीकृत प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी. संचालनालयास प्रत्यक्ष प्राप्त होणारा किंवा ई-मेलवर प्राप्त होणारा पहिला विकल्प ग्राह्य धरण्यात येईल; तद्नंतर प्राप्त होणारे विकल्प ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच विहित नमुन्यात कोणताही विकल्प न देता प्राप्त होणाऱ्या अथवा विकल्प नमुना स्वाक्षरीकृत न केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासकीय सोईनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल. **एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत बदलता अथवा मागे घेता येणार नाही याची सर्व सबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.**

४. अधिकाऱ्यांच्या नावाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | आयोगाचा गुणवत्ता क्र. | नाव | अ.क्र. | आयोगाचा गुणवत्ता क्र. | नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री.ज्ञानराज गणपतराव पौल | ६ | ८ | श्रीम.पूनम सुरेश धिंगाणे |
| २ | २ | श्री.सचिन बाळू सालकर | ७ | ९ | श्रीम.वर्षा वसंत बांगर |
| ३ | ३ | श्री.निलेश बाबासाहेब खेडकर | ८ | ११ | श्रीम.सोनल भगवान ऐनडोले |
| ४ | ६ | श्री.प्रतिक प्रदीप जांभळे | ९ | १२ | श्री.विरेंद्र श्रीहरी चौधरी |
| ५ | ७ | श्रीम.स्नेहल विजय सावंत | | | |

५. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त पदांची विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | महसुली विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|
| १ | नागपूर | १९ |
| २ | अमरावती | ०९ |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | १५ |
| ४ | कोंकण-१ | ०५ |
| ५ | नाशिक | १४ |
| ६ | कोंकण-२ | ४९ |
| ७ | पुणे | ०६ |

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य
मुंबई

सोबत: विकल्प नमुना

# विकल्पाचा नमुना

**सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि.१४/०७/२०२१ अनुसार विभागीय संवर्गाकरिता द्यावयाचा विकल्प**

मी,श्री./श्रीमती/कुमारी.......................................................................................................

याद्वारे असे लिहून देतो/देते की, माझी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या पदासाठी सरळसेवेने निवड झाली आहे. सदर पदास "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" लागू असून माझी सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या पदावर नियुक्ती झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत.

सदर नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने मी सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा पदावर नियुक्तीनंतर माझा पहिला पसंतीक्रम # ......................................... या विभागीय संवर्गासाठी देत आहे.

तसेच- *i) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील अ.क्र.०७ मध्ये माझे प्रकरण येत नाही.

*ii) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील अ.क्र.०७ मध्ये माझे प्रकरण येत असून तदपृष्ठ्यर्थ आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या व दस्तावेजांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

(जोडलेल्या कागदपत्रांची यादी)

दिनांक:

ठिकाण:

(सही)

(नाव):...................................................................

भ्रमणध्वनी क्र.:........................................................

ई-मेल:...................................................................

# १) नागपूर, २) अमरावती, ३) छत्रपती संभाजीनगर, ४) कोंकण-१, ५) नाशिक, ६) कोंकण-२, ७) पुणे यापैकी कोणताही एक महसुली विभाग नमूद करावा.

*लागू नसेल ते खोडावे